## “अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था (MRTI)”, छत्रपती संभाजीनगर

राज्यातील अल्पसंख्याक समुदायाच्या, सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाशी संबंधित समस्यांचा अभ्यास करणे आणि शासनास त्यावरील उपाययोजना सुचवून त्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देणे, याकरिता बार्टी, सारथी, महाज्योती या सारख्या संस्थांच्या धर्तीवर अल्पसंख्याक समुदायासाठी या विभागाच्या अधिपत्याखाली दि.२२.०८.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये “अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था (MRTI)” या स्वतंत्र स्वायत्त संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.

“अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था (MRTI)”, छत्रपती संभाजीनगर या संस्थेची नोंदणी कंपनी कायद्यांतर्गत करणे, संस्थेची कार्यकक्षा व उद्दिष्टे निश्चीत करणे यासाठी MOA (Memorandum of Association) आणि AOA (Articles of Association) तयार करणे या विवक्षीत कामे करुन घेण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१०.०६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्तींनुसार “सल्लागार (Advisor)” एस-२३:६७७००-२०८७०० या वेतनश्रेणीतील सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची “अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था (MRTI)” येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

नियुक्त करावयाच्या उक्त सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी कायम राहील. अधिक माहितीसाठी सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३) दि.१०.०६.२०२५ पहावा.

करार पद्धतीने नियुक्ती करणेबाबतच्या अर्जाचा नमुना आणि अटी व शर्ती शासनाच्या https://mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अपलब्ध आहेत. तसेच अल्पसंख्यांक आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर येथे अर्ज करण्याचा अंतिम दिनांक ३१ जुलै, २०२५ असा आहे.

-स्वाक्षरी-

(प्र. दा. अंधारे)

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**